REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 8 | ISSUE - 6 | MARCH - 2019

# बी.एड. प्रशिक्षणार्थ्यांसाठी ज्ञान व्यवस्थापन प्रतिमान विकसन आणि त्याच्या अंमलबजावणीचा अभ्यास

बिराप्पा शिंदे

## प्रस्तावना :-



सृजनात्मक प्रयत्नांमध्ये अपेक्षित असणाऱ्या सर्व घटकांना मिळून परिप्रेक्ष्य समस्या व ज्ञान यातील सुसंवादाची एक प्रणाली तयार होते घटनात्मकदृष्ट्या या प्रणालीच्या केंद्रस्थानी समस्या व परिघावर परिप्रेक्ष्य असले तरी प्रक्रियात्मक दृष्ट्या ज्ञान महत्वाचे आहे. म्हणून याला ज्ञान व्यवस्था असे संबोधणे अधिक यथार्थ ठरते. ज्ञान व्यवस्था व त्यातील सर्व घटक व एकूण प्रक्रिया यांना अनुलक्षून ज्ञान-व्यवस्थापन ही संकल्पना मान्यता आज पावते आहे.

विद्यापीठे ही ज्ञान निर्मितीची व ज्ञान प्रसाराची केंद्रे असून उद्याच्या उज्वल भवितव्याची तिच आशा स्थाने आहेत. विकासाची प्रक्रिया गतिमान करणारे ज्ञान , संशोधन करणे आणि समृद्ध, संपन्न व्यक्तिमत्व लाभलेले नागरिक घडविणे हाच विद्यापीठांचा जीवित धर्म आहे. उच्च शिक्षणाच्या गुणवत्तेवरच राष्ट्रविकास अवलंबून असतो म्हणूनच राष्ट्रीय ज्ञान आयोगाने मार्च 2007 व 2008 या दोही वर्षात सादर केलेल्या अहवालात उच्च शिक्षणाची गुणवत्ता व संशोधन यांना गति देण्याचे आवाहन केले आहे. स्वातंत्र्योत्तर कालखंडात देशातील महाविद्यालये यांची संख्या कैक पटीने वाढली असून आज जवळ जवळ 350 विद्यापीठ 18000 महाविद्यालये आहेत. ज्ञान आयोगाच्या मते हा विस्तार 2015 पर्यंत पाच पट होणे आवश्यक आहे. उच्च शिक्षणाच्या विस्ताराचा व खर्चाचा प्रश्न ऐरणीवर असतानाच जागतिकरण, निजीकरण अशा अर्थशास्त्रीय प्रवाहानी सर्व व्यवस्थापनाच्या संरचना मुलगामी परिवर्तनाचे आव्हान दिले आहे. एकूणच उच्च शिक्षण व त्याची गुणवत्ता या संदर्भात अव्याहत प्रयत्नांची गरज आहे असे प्रकर्षाणे जाणवते. समकालिन परिस्थितीने निर्माण केलेली आव्हाने आणि शिक्षणाच्या गुणवत्ते बाबतची सद्यस्थिती यातील सुसंवादाच्या निर्मितीसाठी उच्च शिक्षण घेणाऱ्या युवा वर्गाच्या ज्ञान व्यवस्थापनाच्या प्रतिमानाचा शोध घेणे आवश्यक आहे. यादृष्टी पुढील समस्या अभ्यासार्थ निश्चित केली आहे.

## संशोधन समस्येची गरज :

केवळ औद्योगिक क्षेत्राचाच नव्हे तर प्रत्येक क्षेत्राला सेवेचा कौशल्यपूर्ण व्यक्तींचा पुरवठा करण्याचे कार्य विविध विद्यापीठे करत असतात. यात महाराष्ट्रातील मुंबई, पुणे , कोल्हापूर येथील विद्यापीठे अग्रेसर आहेत. या तुलनेने सोलापूर विद्यापीठातील प्रशिक्षणार्थी मागे आहेत. शासनाची अनुदाने, अभ्यासक्रम, विविध सुविधा इत्यादीमध्ये समानता असूनही सोलापूर विद्यापीठातील प्रशिक्षणार्थी मागे का आहेत हे जाणून घेण्यासाठी सदर संशोधनाची गरज आहे. प्रत्येक ज्ञानाच्या सादरीकरणात ते इतर जिल्ह्यातील प्रशिक्षणार्थ्यांच्या तुलनेत मागे का आहेत हे जाणण्यासाठी सोलापूर जिल्ह्यातील प्रशिक्षणार्थ्यांच्या ज्ञान व्यवस्थापनाच्या प्रतिमानाचा अभ्यास करण्याची गरज आहे. बी.एड प्रशिक्षार्थी पुढील काळात शाळेमध्ये अध्ययन-अध्यापनाचे कार्य करणार आहेत. यामुळे यांना ज्ञान व्यवस्थापनाचे ज्ञान असणे गरजेचे आहे. यासाठी त्यांचे याविषयीचे ज्ञान पडताळून पाहण्याच्या दृष्टीने व त्यांना याची पूर्णपणे ओळख करून देण्यासाठी सदर संशोधनाची गरज आहे.

**संशोधन समस्येचे शीर्षक :**
**बी.एड. प्रशिक्षणार्थ्यांसाठी ज्ञान व्यवस्थापन प्रतिमान विकसन आणि आणि त्याच्या अंमलबजावणीचा अभ्यास**

**कार्यात्मक व्याख्या :**
**बी.एड. प्रशिक्षणार्थी :** सोलापूर जिल्ह्यातील अध्यापक शिक्षण पदवीसाठी प्रवेश घेतलेले बी.एड. महाविद्यालयातील प्रशिक्षणार्थी.
**ज्ञान व्यवस्थापन प्रतिमान विकसन:**ज्ञान व्यवस्थापन तंत्राचा उपयोग करून तयार केलेले पाठनियोजन.
**अंमलबजावणीचा अभ्यास :** ज्ञान व्यवस्थापन प्रतिमान पाठनियोजनाद्वारे केलेल्या अध्यापनाच्या अंमलबजावणीचा अभ्यास.

**संशोधनाची उददि्ष्टे :**
1. बी.एड. प्रशिक्षणार्थ्यांच्या ज्ञानविषयक संकल्पनेचा शोध घेणे.
2. प्रशिक्षणार्थ्यांकडून ज्ञान व्यवस्थापनासाठी वापरल्या जाणाऱ्या विविध स्रोतांचा शोध घेणे.
3. बी.एड. प्रशिक्षणार्थ्यांसाठी ज्ञान व्यवस्थापन प्रतिमान विकसित करणे.
4. बी.एड. प्रशिक्षणार्थ्यांसाठी ज्ञान व्यवस्थापन प्रतिमानाच्या अंमलबजावणीचा अभ्यास करणे.

**संशोधनाची व्याप्ती :**
1. प्रस्तुत संशोधन सोलापूर विद्यापीठातील बी.एड. अभ्यासक्रमाशी संबंधित आहे.
2. प्रस्तुत संशोधन सोलापूर विद्यापीठातील बी.एड. प्रशिक्षणार्थ्यांशी संबंधित आहे.
3. प्रस्तुत संशोधनात बी.एड. प्रशिक्षणार्थ्यांसाठी उपलब्ध असलेल्या विविध ज्ञानस्रोतांचा अभ्यास केला जाणार आहे.
4. प्रस्तुत संशोधनात ज्ञान व्यवस्थापनाशी संबंधित विविध कौशल्यांचा अभ्यास केला जाणार आहे.

**संशोधनाची मर्यादा :**
1. प्रस्तुत संशोधन सोलापूर विद्यापीठातील बी.एड. अभ्यासक्रमापुरतेच मर्यादित आहे.
2. प्रस्तुत संशोधन हे सोलापूर विद्यापीठातील बी.एड. प्रशिक्षणार्थ्यांसाठी उपलब्ध असलेल्या विविध ज्ञानस्रोतांपुरतेच मर्यादित आहे.
3. प्रस्तुत संशोधन हे ज्ञान व्यवस्थापनाशी संबंधित विविध कौशल्यांपुरतेच मर्यादित आहे.

**संशोधनाचे महत्त्व :** शिक्षकाच्या प्रभावी अध्यापनाला हे संशोधन उपयुक्त ठरेल. पर्यायाने विद्यार्थ्यांच्या विविध संपादन क्षमता, आकलन क्षमता, बौध्दिक क्षमता , उपयोजन क्षमता या क्षमतामध्ये वाढ होण्यास मदत होईल. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या ज्ञानाचे क्षितिज वृध्दींगत होईल.

- **शून्य परिकल्पना -** ज्ञान व्यवस्थापन प्रतिमानाद्वारे अध्यापन परिणामस्वरूप प्रशिक्षणार्थ्यांच्या संपादनात सार्थ फरक राहणार नाही.

**संशोधनात संशोधन पद्धतीची निवड :-** सदर सशोधनासाठी **प्रायोगिक संशोधन पध्दती**ची निवड केली आहे.

**संशोधनासाठी नमुना निवड :-** ज्ञान व्यवस्थापन प्रतिमान विकसनाच्या अंमलबजावणीचा अभ्यास करण्यासाठी सहेतूक नमुना निवड पध्दतीने कॉलेज ऑफ एज्युकेशन, बार्शी या महाविद्यालयाची निवड केली. या महाविद्यालयातील 50 विद्यार्थ्यांची निवड लॉटरी पध्दतीने केली. या 50 विद्यार्थ्यांचे प्रथम सत्र परीक्षेतील गुणांवरून दोन समतुल्य गट केले. प्रत्येक गटात 25 विद्यार्थ्यांची निवड केली.

**संशोधनासाठी साधने व तंत्राची निवड :-** ज्ञान व्यवस्थापन प्रतिमान विकसन आणि आणि त्याच्या अंमलबजावणीचा अभ्यास करण्यासाठी - संपादणूक चाचणी
या संशोधन साधनांची प्रस्तुत संशोधनासाठी निवड केली आहे.

## निष्कर्ष :

● **नियंत्रित व प्रायोगिक गटाची तुलना**

| गट | मध्यमान | प्रमाण विचलन | t- मूल्य | t- मूल्य कोष्टकानुसार |
|---|---|---|---|---|
| नियंत्रित गट | 15.56 | 3.710 | | |
| प्रायोगिक गट | 17.96 | 3.571 | 2.264 | 2.021 |

वरील कोष्टकांवरून असे दिसून येते की , मिळालेल्या **'t'** मूल्यावरून शून्य परिकल्पनेचा त्याग करायचा की स्वीकार करायचा हे त्या मूल्यांची ०.०५ किंवा ०.०१ या सार्थकता स्तरावर विशिष्ट स्वाधीनता मात्रेकरिता पत्रकात दिलेल्या **'t'** मूल्यांशी तुलना करून ठरविले जाते. यावरुन आपणाला असे अन्वयार्थ लावता येईल की, स्वाधीनता मात्रा 48 आहे. परिकल्पना द्विपुच्छ आहे. 0.05 सार्थकता स्तराची किंमत 2.021 आहे. संशोधकाने केलेल्या तुलनात्मक अभ्यासाचे t - मूल्य 2.264 आहे. हे गुणोत्तर 0.05 सार्थकता स्तरापेक्षा जास्त आहे. म्हणून शून्य परिकल्पनेचा त्याग करावा लागेल .

संशोधनातून आलेली **'t'** ची किंमत ही कोष्टकातील दर्शविलेल्या किंमतीपेक्षा अधिक असल्याने शून्य परिकल्पनेचा त्याग होतो. नियंत्रित व प्रायोगिक गटांना दिलेल्या चाचणीच्या गुणांमधील फरक हा योगायोगाने आलेला नसून ज्ञान व्यवस्थापन प्रतिमान यामुळे आलेला आहे. म्हणून दोन गटात असणारा फरक सार्थक किंवा लक्षणीय आहे. त्यामुळे संशोधकाने मांडलेली ज्ञान व्यवस्थापन प्रतिमानामुळे प्रशिक्षणार्थ्यांच्या गुणांच्या संपादनात वाढ होते ही परिकल्पना स्वीकारावी लागते. यावरून असे म्हणता येईल की , ज्ञान व्यवस्थापन प्रतिमान बी.एड.च्या प्रशिक्षणार्थ्यांसाठी अधिक परिणामकारक आहे.

## संदर्भग्रंथ सूची

१. कक्कड, गुरुप्रसाद आणि गायकवाड, शशी (१९९५) शिक्षण व अध्यापक शिक्षण, नूतन प्रकाशन, पुणे
२. पारसनीस, न.रा. (२००८) शिक्षकांचे प्रशिक्षण, नूतन प्रकाशन पुणे
३. .मुळे, रा.श. आणि उमाठे, वि.तु. (१९९८) शैक्षणिक संशोधनाची मुलतत्वे (तृतीय आवृत्ती) विदया प्रकाशन नागपूर.
४. भिंताडे, वि.रा. (२००७) शैक्षणिक संशोधन पध्दती. (प्रथम आवृत्ती )पुणे नित्य नूतन प्रकाशन.